NEHRU BAL PUSTAKALAYA

# महाराजा रणजित सिंह


प्रीतम सिंह

चित्रे


नीता गंगोपाध्याय




ISBN 81-237-1427-0
पहिली आवृत्ती 1994 (शके 1916)
दुसरी आवृत्ती 1995 (शके 1917)
तिसरी आवृत्ती 2002 (शके 1923)
मूळ © प्रीतम सिंह, 1989
मराठी अनुवाद © नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया
Maharaja Ranjit Singh *(Marathi)*

रु. 11.00

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-5 ग्रीन पार्क
नवी दिल्ली-110 016 यांनी प्रकाशित केले.



लाहोरचा किल्ला

नेहरू बाल पुस्तकालय

# महाराज रणजित सिंह

प्रीतम सिंह

अनुवाद
सुधा नरवणे

चित्रे
नीता गंगोपाध्याय



नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया



महाराजा रणजित सिंह

# महाराजा रणजित सिंह

त्या दिवशी संध्याकाळी आजी वैतागल्यासारखी का वागत आहे, हे मुलांना कळेना. रोज रात्री निजण्यापूर्वी ती त्यांना गोष्ट सांगे; पण आज अगदी तिची विनवणी करावी लागत होती.

शेवटी आजीने मुलांच्या विनवण्यांपुढे हार खाल्ली. तिने गोष्ट सांगायला प्रारंभ करताच मुले आनंदाने टाळ्या पिटू लागली.

"ए, बस करा, थांबवा ते टाळ्या पिटणं. . ." आजी थोडी चिडूनच ओरडली. "तुम्हाला गोष्ट ऐकायची असेल तर मुकाट्यानं बसा बघू सगळेजण."

मुले एकदम शांत झाली व लक्षपूर्वक ऐकू लागली.

"खूप वर्षांपूर्वी रणजित सिंह नावाचा एक राजा होऊन गेला. तो इतर राजांपेक्षा खूपच वेगळा होता. इतर राजांची प्रजा आपापल्या राजांना घाबरून असायची तर रणजित सिंहाची प्रजा त्याच्यावर प्रेम करायची."

"आजी, का गं सगळे लोक त्याच्यावर प्रेम करायचे ?" सनीने विचारले.

"जो राजा प्रजेवर प्रेम करतो, त्याची प्रजा त्याच्यावर प्रेम करूनच प्रेमाची परतफेड करते." आजी त्यांना समजावून सांगत पुढे म्हणाली की, "तुम्ही इतरांवर प्रेम केलेत की तुम्हाला उलट प्रेमाचाच लाभ होतो. अगदी साधं, सोपं गणित आहे हे."

हर्षने मधेच विचारले, "रणजित सिंहानं कसं प्रेम केलं आपल्या प्रजेवर ?"

"ए, तुम्ही असं मधेमधे बोलू नका." अस म्हणून ती गोष्ट पुढे सांगू लागली. "एक दिवस रणजित सिंह आपल्या हत्तीवर बसून चालला होता. त्याच्या बरोबर त्याचे सैनिक होते. रपेट करता करता तो एका मळ्यात आला. तेथील झाडे पिकलेल्या फळांनी लगडली होती. गावातील मुले झाडावर दगड मारून खाली पडलेली फळे फस्त करीत होती. एकदम काय झाले की एका मुलाने आपला जोर लावून भिरकावलेला दगड झाडाला न लागता राजाच्या कपाळालाच लागला."

हे ऐकल्यावर हित्तीला अगदी दम धरवेना. त्याने घाबरून विचारले, "म्हणजे ? राजाला खरंच खोकाबिक पडली की काय ?"

"हो रे बाबा." आजी म्हणाली, "अगदी राजाच्या कपाळावरच नेम बसला त्याचा. राजाच्या सैनिकांनी त्या मुलांचा पाठलाग करून त्यांना पकडलं आणि त्यांना राजापुढे उभे करण्याआधी बेदम मार दिला. हे पाहताच राजाने ताबडतोब सैनिकांना मारणे थांबवण्याची आज्ञा केली आणि म्हणाला, "लहान मुलं फुलासारखी असतात हे तुम्हाला कळत नाही का ? त्यांच्याशी आपण कठोरपणे वागता कामा नये. त्या मुलानं फळावर नेम धरला पण दगड चुकून मला लागला यात त्याचा काय दोष ? आता असं करा मुलांना खाऊ द्या अन् त्यांचे खिसे चांदीच्या नाण्यांनी भरा. आयुष्यभर त्यांना आठवण राहील की एक दिवस आपल्याला एक राजा भेटला होता." हित्ती म्हणाला, "रणजित सिंह हा खरोखरीच मोठ्या मनाचा राजा असला पाहिजे. आमच्या शाळेतील गुरूजींच्या टकलावर कुणी दगड टाकला तर गुरुजी त्याच्या अंगाची सालडी काढतील."

"हित्ती बेटा. . ." आजी त्याला दटावीत म्हणाली, "आपल्या गुरुजींविषयी असं अनादरानं बोलू नाही. बरं, आता राजाची आणखी एक गोष्ट ऐका."

एका वर्षी काय झालं की मुळी पाऊस पडलाच नाही. गव्हाची उभी पिकं

जळून गेली. राजाने लोकांना दिलासा दिला - 'काळजी करू नका. माझ्या कोठारात गेल्या वर्षीच्या धान्याचा साठा आहे. ज्यांच्याजवळ खायला अन्न नसेल त्यांनी माझ्याकडे या अन् पोतंभर गहू घेऊन जा.' असे फर्मान सोडून राजा थांबला नाही, तर तो रोज संध्याकाळी भिकाऱ्याच्या वेषात गावभर हिंडत राही व आपल्या हुकूमाचे पालन केले जात आहे का ते पाही.

एके दिवशी राजा एका झोपडीजवळून जात असताना त्याने एक म्हातारा एका भरलेल्या पोत्यावर हताश बसलेला पाहिला. राजाने त्याला विचारले 'बाबा, रात्र व्हायला लागली आहे. तू असा बाहेर का बसला आहेस ?'

"म्हातारा म्हणाला, 'हे जड पोतं मला उचलता येत नाही. कसं नेऊ मी ते आत ? काय करू मी ?' राजाने त्याला हात देऊन उठवले आणि स्वत: पोते घेऊन म्हणाला, 'चल बाबा, मी नेतो तुला आत - दाखव तुझी झोपडी कुठं आहे ते.' राजाने पोते झोपडीत नेऊन ठेवले. म्हाताऱ्यालाही हाताला धरून आत नेऊन बसवले."

अवी चटकन् म्हणाला, "आजकाल असं दिसणार नाही. गरिबाच्या मदतीला राजाच काय पण कुणी भिकारीसुद्धा पुढं येणार नाही."

पुनीतने विचारले, "अवी, सांग बरं, तुला काय वाटतं - राजानं म्हाताऱ्याचं पोतं उचलून नेलं हे योग्य केलं की. . ."

"हो तर !" अवी उत्तरला, "अगदी बरोबर केलं - आजी सांगतेय् ना - की रणजित सिंह हा एक वेगळाच असामान्य राजा होता. त्याच्या अशा दयाळू स्वभावमुळेच तो प्रजेचा लाडका बनला होता."

अवीचे उत्तर ऐकून आजीला समाधान वाटले. ती म्हणाली, "हो, अगदी बरोबर केलं राजानं. म्हाताऱ्या माणसाला मदत करणं हे सत्कृत्यच आहे. ते केल्यानं त्याच्या प्रतिष्ठेला मुळीच बाध आला नाही. ही घटना लोकांना कळल्यावर ते राजावर

अधिकच प्रेम करू लागले. मुलांनो, जो मनुष्य स्वत:ला मोठा न समजता परोपकारी वृत्तीने वागतो तो खरोखरीच महान् असतो. बाकीची माणसं नुसती घमेंडखोर असतात. रणजित सिंह खऱ्या अर्थानं महान् होता म्हणून त्याची प्रजा त्याला महाराजा म्हणू लागली."

"महाराजा म्हणजे काय ?" सनीने विचारले.

"महा म्हणजे अतिशय मोठा - महाराजा म्हणजे. . ."

"मोठा महान् राजा - होय ना ?" सनी म्हणाला.

"शाब्बास सनी", आजी त्याची पाठ थोपटीत म्हणाली, "मग आता या पुढं आपण त्याला महाराजा रणजित सिंह म्हणू या." सनी पुन: म्हणाला.

"अगदी नामी बोललास रे बाळा, इथून पुढं आपण त्याला महाराजाच म्हणू या."

"आजी, आजी" आजीच्या खांद्याला धरून तिचे लक्ष आपल्याकडे वळवीत हर्ष म्हणाला, "आजी एक विचारू का तुला ?"

"विचार ना रे काय म्हणतो आहेस ?"

"असं सांग आजी, की हा महाराजा कुठपर्यंत शिकला होता ?" आजीला हसू आवरेना.

"अरे, तो तर प्राथमिक शाळेतसुद्धा गेला नव्हता. त्याला स्वत:चं नाव तरी लिहिता येत होतं का नाही कुणाला ठाऊक !" हे ऐकून सुनीतने आश्चर्याने विचारले, "आँ ? तो शाळा शिकला नव्हता, मग राजा कसा झाला ?"

आजी मुलांना समजावून सांगू लागली की, "शाळेत जाऊन परीक्षा पास होणं महत्त्वाचं आहेच. परंतु केवळ परीक्षा देऊन कुणी लहान किंवा मोठं होत नसतो. सत्कृत्य केल्यानंच माणसाला मोठेपणा मिळतो. रणजित सिंह एका विशाल राज्याचा

राजा बनला. त्याच्या पित्याकडून त्याला लहानशी जहागीर मिळाली होती. पण स्वतःच्या कर्तृत्वानं त्यानं त्या जहागिरीचं साम्राज्यात रूपांतर केलं. तो फार पराक्रमी होता म्हणून त्याला मोठा मानलं जातं. तो प्रजेला सदैव सुखासमाधानात ठेवण्याचा प्रयत्न करीत असे म्हणून त्याला मोठा म्हणतात. रणजित सिंह खूप शहाणा व



महाराजा रणजित सिंह आणि त्याचे दरबारी

समजुतदार होता. या सर्व कारणांमुळं त्याला महान् मानलं जातं. मुलांनो, तुम्ही आजपर्यंत एक ना एक परीक्षा उत्तीर्ण झाला असाल - यापुढंही अनेक परीक्षा उत्तीर्ण व्हाल. पण हे लक्षात ठेवा की केवळ एकामागून एक परीक्षा पास होऊन कुणी महान् बनत नसतं."

"आजी, तू सांगत होतीस की रणजित सिंह फार शूर होता पण अजून तू त्याच्या पराक्रमाची एकही गोष्ट सांगितली नाहीस. . ." पुनीत अधीरपणे म्हणाला.

"अरे, त्याच्या पराक्रमाच्या खंडीभर गोष्टी आहेत. पण त्या ऐकायच्या आधी तुम्ही मला असं सांगा की तुमच्यात सगळ्यात शूर कोण आहे ?"

"हित्ती - हित्ती. . ." अवी ओरडला, "तो सिंहालासुद्धा घाबरत नाही, पण गंमत म्हणजे उंदीर दिसला की तो किंचाळायला लागतो." हे ऐकताच एकदम हशा पिकला. हित्ती रागाने उठून म्हणाला, "आजी, त्याला सांग हं गप्प बसायला. नाहीतर मी ठोकून काढीन त्याला."

"हित्ती," आजी त्याला शांत करीत म्हणाली, "असं एकदम रागावू नये बाबा. त्यानं गंमत केली तुझी. कुरापत काढायला नाही बोलला तो असं ! कुणी आपली चेष्टा केली तर आपण त्याला गंमतीनं प्रत्युत्तर करावं. असं एकदम गुद्यावर येऊ नये. केव्हातरी आपल्याला अवीचीही अशीच गंमत करण्याची संधी मिळेल. . ."

हित्ती शांत होऊन म्हणाला, "आजी, तुझं बरोबर आहे. आपण सगळे मिळून करूच त्याची गंमत."

मधेच थांबलेली गोष्ट आजीने पुढे सुरू केली, "महाराजा रणजित सिंहाचे पिता सरदार महासिंग यांना देवाज्ञा झाली तेव्हा रणजित जेमतेम दहा वर्षाचा होता. आता मी तुम्हाला जो प्रसंग सांगणार आहे तो घडला त्यावेळी रणजित सिंह तेरा वर्षांचा म्हणजे साधारण या पुनीतच्या वयाचा होता. एवढ्या कोवळ्या वयात

देखील त्याला घोड्यावर बसता येत होतं आणि तलवारदेखील सराईतपणे चालवायला येत होती. एक दिवस तो आपल्या आवडत्या घोड्यावर बसून शिकारीला गेला. त्याच्याबरोबर दहाबारा घोडेस्वार होते. शहराबाहेर पडताच त्यानं घोड्याला टाच दिली. त्याबरोबर घोडा चौखूर वाऱ्यासारखा पळू लागला. रणजित सिंहा बरोबरचे घोडेस्वार खूपच मागं राहिले. तो एकटाच दौडत पुढं गेला व दिसेनासा झाला. आपल्या घोड्यानं आपल्याला नबाब हशमतखान छत्ता याच्या हद्दीत नेलं आहे हे त्याच्या लक्षात आलं नाही. नबाबाच्या मनात रणजित सिंहाला ठार करून त्याची जहागिर बळकावण्याचा बेत होता. योगायोगानं नबाबही त्याच दिवशी शिकारीला बाहेर पडला होता. दोघांची समोरासमोर गाठ पडल्यावर रणजित सिंहाला एकट्यालाच पाहून नबाब मनाशी म्हणाला - 'आता या पोराला कोणी वाचवू शकणार नाही.' आपली तलवार परजून तो रणजित सिंहाच्या अंगावर धावून गेला."

"त्याचा घोडासुद्धा रणजित सिंहाच्या घोड्यासारखा भरधाव पळायचा कां?" हर्षने विचारले.

"होय, त्याचा घोडाही वाऱ्यासारखा उधळायचा."

"मग काय झालं? नबाब मेला की..." सनीने आपला प्रश्न अर्धवटच सोडला.

"हो तर! नबाबाची वेळच भरली. रणजित सिंहानं एकट्यानंच त्याच्याशी दोन हात करून त्याला यमसदनाला पाठवलं. रणजित सिंहाचे साथीदार तिथं येऊन पोचले तेव्हा त्यांना नबाबाचं धडावेगळं शिर धुळीत पडलेलं दिसलं. तत्क्षणी त्यांना काय झालं ते उमगलं आणि ते रणजित सिंहाची वाहवा करू लागले."

"खरंच तो तेव्हा फक्त तेरा वर्षांचा होता?" सुनीतने आश्चर्याने विचारले.

"अगदी खरं! ही घटना त्याच्या वयाच्या तेराव्या वर्षीच घडली." आजी उत्तरली.

"मग तो खरंच शूर असला पाहिजे." अवी आणि हित्ती दोघे एकदमच म्हणाले.

आजी गोष्ट पुढे सांगू लागली, "तो इतका पराक्रमी होता की विसाव्या वर्षी त्यानं लाहोर शहर काबीज केलं. अवघ्या एका दिवसात त्यानं ते मोठं शहर ताब्यात घेण्याची मोहीम पूर्ण केली. सन 1800 च्या आधी एक वर्षभरच त्यानं हा विजय मिळवला. लाहोरचा राजा झाल्यावर रणजित सिंहानं प्रजेला सुख देण्याचे सर्वतोपरी प्रयत्न केले. थोड्याच दिवसात लोक त्याला महाराजा म्हणू लागले. ते ऐकून त्याच्या मनात विचार येऊ लागला की, 'लोक मला महाराजा म्हणतात पण माझं राज्य किती लहान आहे !' या विचाराचा पाठपुरावा करून त्याने आपल्या राज्याचा विस्तार करण्याचे ठरवले. त्यासाठी त्याने आणखी सैनिकांची भरती आणि शस्त्रास्त्रांची जमवाजमव करायला प्रारंभ केला."

"सैनिकभरती म्हणजे काय ?" सनीने विचारले.

"म्हणजे सैन्यात आणखी लोक घेणे," असे उत्तर देऊन आजी पुढे सांगू लागली की, "आपल्या सैन्यात युद्धनिपुण सैनिक असावेत, अशी रणजित सिंहाची इच्छा होती. आपल्या सैनिकांना उत्कृष्ट प्रशिक्षण देण्यासाठी त्यानं फ्रान्स, इटली तसंच अन्य युरोपीय देशातून लष्करी अधिकारी आणवले आणि त्यांची चांगल्या पगारावर नेमणूक केली. तो स्वत: शीखधर्मीय होता. परंतु आपल्या सेवकांची नेमणूक करताना धर्माचा भेदभाव मनात आणला नाही."

"तो स्वत: शीख होता तर त्याने फक्त शिखांचीच नेमणूक का केली नाही ?" अवीचा प्रश्न. आजी म्हणाली,

"अरे, रणजित सिंह नेहमी म्हणे की सर्व मानव एकसारखे आहेत. त्यांचा धर्म किंवा जातपात कोणतीही असो - सर्वजण समान आहेत. असं नुसतं बोलून तो थांबत नसे, तर हा विचार त्यानं आचरणात आणला होता. त्याचा प्रधानमंत्री राजा ध्यानसिंह हा मूळचा जम्मूचा व हिंदुधर्मीय होता. इतर देशांच्या अधिपतींशी व्यवहार



महाराजा रणजित सिंह शिकारीस जाताना



अकाली

करण्याकरता त्यानं नेमलेला फकीर आझिझुद्दिन हा मनुष्य मुसलमान होता. त्याच्या प्रकृतीची काळजी वाहाणारा डॉक्टर हकिम नुरुद्दीन हाही मुसलमान होता. त्याच्या तिजोरीचा सांभाळ करणारा माणूस भवानी दास हिंदू होता. रणजित सिंहाच्या सैन्यात अनेक ख्रिस्ती अधिकारी होते. माणसाची निवड करताना तो गुणांकडे लक्ष देत असे. बाह्य रंगरूपाकडे नाही."

"आजी, कित्ती छान सांगते आहेस तू हे सारं. आपल्या भारत देशात हे असंच असावं. होय ना ?"

"पुनीत, तू छान भाषण करू शकशील रे. तू म्हणतो आहेस ते अगदी बरोबर आहे. चांगलं काम करणाराला कामाचं योग्य श्रेय मिळालं तर देश झपाझप पुढे जाईल नाहीतर देशाची पीछेहाट होईल. बरं ते झालं ! मुलांनो मला सांगा, रणजित सिंहाचा जन्म कुठं झाला, माहीत आहे तुम्हाला ?"

"अमृतसर," सुनीत ओरडला.

"नाही."

"लाहोर," अवी ओरडला

"छे, मुळीच नाही !"

हित्ती म्हणाला, "कुणाला ठाऊक कुठं जन्मला तो ते ! पण कुठंतरी जन्म झाला हे नक्की." हे बोलणं ऐकून सगळ्यांना हसू लोटलं.

"आपला हित्ती अगदी ब्रह्मज्ञानच सांगतोय," आजी गमतीने बोलली आणि सांगू लागली.

"रणजित सिहाचा जन्म गुजराणवाला या गावी झाला. हे शहर आता पाकिस्तानात लाहोरपासून 67 किलोमीटर अंतरावर आहे. ए हर्ष, तू सांग बरं रणजित सिंहाचा जन्म कोणत्या गावी झाला ?"



"गढींवालमध्ये . . ." हर्षने बिचकतच सांगितले.

सुनीतने त्याचा पाठीत हळूच एक धपाटा मारला आणि म्हणाला, "ए वेडोबा, तुझं लक्ष कुठं आहे ? आत्ताच नाही का आजीनं सांगितलं ? गुजराणवाला-गढींवाल



महाराजा रणजित सिंहाचा दरबार

नव्हे. आता नीट ध्यानात ठेव बरं का."

हर्षने सुनीतला बाजूला ढकलले. तो एकदम रुसूनच बसला.

आजीने त्याला आपल्या मांडीवर घेतले. हळूच त्याची पापी घेत ती म्हणाली, "हर्ष मोठा गोड छोकरा आहे. हुषार पण किती आहे ? त्याला गर्ढीवाल गाव माहीत आहे. मला कुठं ते माहीत आहे ? आता त्याला गुजराणवाला शहर देखील माहीत झालं. होय ना रे ?"

हर्षने खुशालून मान हलवली.

मग आजी म्हणाली, "हं, कुठवर आली होती आपली गोष्ट बरं.. ? ह, आठवलं. रणजित सिंहाचा जन्म गुजराणवाला शहरी झाला. तो लहान असताना त्याला देवी आल्या होत्या. देवी बऱ्या झाल्या तरी अंगभर त्याचे व्रण राहातात. त्या काळी पुष्कळ मुलं देवी या रोगामुळे दगावत. अशा भयंकर आजारातून रणजित सिंह वाचला हे महद्भाग्यच होय. पण त्याच्या कपाळावर व तोंडावर देवीचे व्रण राहिले. म्हणून त्याला देखणेपणा लाभला नाही."

"आजी गं, त्याच्या वडिलानी लहानपणी त्याला देवीची लस का नाही टोचली ?" अवीची शंका.

"त्या काळी लस नव्हतीच", आजी समजावून सांगू लागली. "आता देवीची लस उपलब्ध असल्यामुळं या रोगाचं संपूर्ण जगातून निर्मूलन झाल आहे. त्या काळी ही लस मिळत असती तर रणजित सिंहाचा डावा डोळा वाचला असता."

"आँ ! त्याच्या डोळ्याला काय झालं होतं ?"

"त्या डोळ्याच्या आत देवीचा फोड आला होता. म्हणून तो डोळा निकामी झाला."

"अरे बापरे !" पुनीतने उद्‍गार काढला आणि तो विचारू लागला, "आजी,



महाराजा रणजित सिंहाची तसबीर

एवढा मोठा राजा अन् त्याला एकच डोळा - ! लोक त्याची चेष्टा करीत की काय ?"

"छे छे ! मुळीच नाही." आजी म्हणाली, "लहान वयातच रणजित सिंहानं इतकं कर्तृत्व गाजवलं होतं की कुणी त्याची चेष्टा करायला धजावतच नसे. पण तो

स्वतःच कधीकधी स्वतःची चेष्टा करायचा. कधी म्हणायचा, मला एकच डोळा का आहे माहीत आहे तुम्हाला? आपणच उत्तर द्यायचा. अशासाठी की मी माझ्या प्रजेला समानतेनं वागवावं, उच्च-नीच असा फरक मी करू नये म्हणून!

"मुलांनो, थोडा विचार करा त्या मुलाचा! ज्याच्या तोंडावर देवीचे व्रण होते, एक डोळा कामातून गेलेला. बिचाऱ्याचे वडील तो दहा वर्षाचा असताना वारलेले. त्याला शाळेत जायला सवड नाही. शेजारचे लोक त्याची जहागीर बळकावायला टपलेले. . .काय केलं असतं दुसऱ्या एखाद्यानं? हातपाय गळून गेले असते त्याचे. पण रणजित सिंह फार शूर आणि खंबीर मनाचा होता. अडचणींचे डोंगर उभे राहिले तरी तो डगमगायचा नाही. आपण बेडरपणा दाखवल्याशिवाय आपला निभाव लागणार नाही हे त्याला कळून चुकले होते. नाहीतर वडिलांनी जी काय जहागीर मागं ठेवली होती तीही हातातून निसटून जाण्याचा संभव होता."

"त्याचे भाऊ त्याला मदत करीत नव्हते का?" पुनीतने विचारले.

"अरे, रणजित हा तर आपल्या आईवडिलांचा एकुलता एक मुलगा होता. त्याला भाऊबिऊ नव्हते." असे सांगून आजी पुढे म्हणाली की, "आता लक्ष देऊन ऐका. त्या काळी प्रत्येक शूर पुरुषाला घोड्यावर बसायला शिकणं आवश्यक असे. तसंच धनुष्यबाण, बंदूक, तलवार ही शस्त्रं चालवायला येणं जरूरीचं असे. रणजित पटाईत घोडस्वार होता. त्याला तलवारही कुशलतेनं चालवता येई. आपल्या पित्याच्या मृत्युनंतर रणजित सिंहानं अश्वारोहण, धनुर्विद्या, तलवारबाजी यांचा अधिक सराव करण्यास प्रारंभ केला. त्याचे गुरू म्हणत लौकरच हा सर्व विद्यात आमच्यापेक्षा जास्त पारंगत होईल."

अवीने विचारले, "आजी, रणजित सिंहाला हे कसं कळलं की त्याला खूप लढाया कराव्या लागतील?"

आजी म्हणाली, “अरे, त्या काळात पंजाबमधे अनेक छोटीछोटी राज्यं होती. हे राजे सारखे आपसात भांडत. ते पाहून रणजित सिंहाच्या मनात विचार आला की आपण मोठं सामर्थ्यशाली सैन्य जमवलं तर या राजांना जिंकून घेता येईल आणि आपल्या राज्याचा विस्तार करता येईल. असं झालं तर पर्शियन आणि अफगाण परचक्रही रोखता येईल. हे लोक पंजाबवर हल्ला करून लुटालूट करून परत जात. हे रणजित सिंहाला थांबवायचं होतं. एकदा एक निर्धार केला की तो तडीला नेल्याशिवाय रणजित सिंह राहात नसे”.

“हो, आजी, पण महाराजा रणजित सिंहाचं राज्य केवढं होतं?” हित्तीने विचारले.

“मला नेमकं माहीत नाही -” आजी म्हणाली. “त्यासाठी तुम्हाला नकाशा पहावा लागेल. पण मला एवढं पक्कं माहीत आहे की त्याच्या राज्याच्या एका बाजूला अफगाणिस्तान, तिबेट आणि चीन हे देश होते तर दुसऱ्या बाजूला लुधियाना, फिरोजपूर पासून खाली सिंधपर्यंत त्याचं राज्य पसरलं होतं. “सर्व मुलुख त्याच्या अंमलाखाली होता.”

“वा! वा! छान! किती पराक्रम” अवी उद्‌गारला. “या रणजित सिंहानं पठ्ठयानं आपलं राज्य केवढं वाढवलं, मग आजी, त्यानं लुधियाना आणि फिरोजपूरच्या पलिकड जाऊन दिल्ली का नाही काबीज केली?”

“कारण इंग्रजांनी ती आधीच काबीज केली होती. त्यांनी रणजित सिंहाला सांगून ठेवल होतं, ‘महाराज, तुम्ही आमच्या वाटेला जाऊ नका म्हणजे आम्हीही तुम्हाला त्रास देणार नाही.’ रणजित सिंहानं हे मान्य केलं व आपला मोहरा दुसरीकडे वळवला.”

“तेव्हा तो किती वर्षांचा होता?” सुनीतच्या या प्रश्नाला उत्तर देताना आजीने सांगितले की, “महाराजा रणजित सिंहाचा जन्म 1837 मधे झाला. आणि त्याचा



मृत्यु 1839 साली झाला. म्हणजे त्याचं आयुष्य किती वर्षांचं होतं ? सांगा बरं. हं, एकूणसाठ वर्षं बरोबर आहे. एकूणसाठ म्हणजे साठापेक्षा एक कमीच. एकूणसाठ वर्षं म्हणजे काही फार मोठं वय नव्हे. परंतु त्या कालावधीत त्यानं गाजवलेला पराक्रम कुणीच कधीच विसरणार नाही. बरं, मुलांनो मला हे सांगा, तुम्हाला ही गोष्ट ऐकायचा कंटाळा तर आला नाही ? नीट ऐकताय् ना ? तुम्हाला झोप आली



रणजित सिंहाची चढाई

असली तर तसं सांगा. आपण थांबू अन् झोपू या."

मुले या गोष्टीत अगदी रंगून गेली होती. आजीनेही ते ताडले होते म्हणून मुलांच्या उत्तराची वाट न पाहता ती पुढे सांगू लागली, "आपल्या संपूर्ण कारकीर्दीत रणजित सिंहानं कधी कुणाला फाशीची शिक्षा दिली नाही. गुन्हेगारांना शिक्षा करण्यापेक्षा त्यांना क्षमा करणं हे त्याचं ब्रीद होतं. एकदा त्याच्या कानावर आलं की त्याच्या अधिकाऱ्यांनी मीठ वाहून नेणाऱ्या उंटांच्या एका तांड्याला अडवलं आहे. ही बातमी कळताच त्यानं त्या तांड्याला सोडवून त्यांना पुढं जाऊ देण्याची आज्ञा दिली. आणखी एक प्रसंग सांगते, एकदा त्याला कळलं की एका जमीनदारानं आपल्या शेजारच्या दुर्बल शेतकऱ्याची जमीन बळकावली आहे. रणजित सिंहानं ताबडतोब त्या दांडग्या जमीनदाराला समज दिली आणि शेजाऱ्याची जमीन सोडून देण्याचा हुकूम केला. रणजित सिंह मनानं सुसंस्कृत होता. एकदा त्याचे सैनिक पठाणी मुलखात मोहिमेवर गेले असता तिकडं काही दुर्मिळ पुस्तकं आहेत अशी खबर त्याला मिळाली. लगेच त्यानं तिकडे काही घोडेस्वार पिटाळले आणि मोहिमेत त्या पुस्तकांचं काडीमात्र नुकसान होता कामा नये असा आदेश दिला. असंच केव्हातरी त्याला कळलं की कुणा एका मौलवीनं वर्षानुवर्षं परिश्रम करून कुराणाची सुंदर प्रत तयार केली आहे. कुराण म्हणजे मुसलमानांचा पवित्र ग्रंथ माहीत आहे ना मुलांनो, तुम्हाला ? ती प्रत पाच हजार रूपयांना विकली जावी अशी मौलवीची इच्छा होती. तसा कुणी माणूस मौलवीला भेटेना म्हणून तो ती प्रत परदेशी नेत आहे असं कळताच महाराजा रणजित सिंहानं मौलवीला पाच हजार रुपयांऐवजी दहा हजार रुपये देऊन तो सुंदर ग्रंथ विकत घेतला. रणजित सिंह म्हणाला, मी मुसलमान नसलो म्हणून काय झालं ? असे धर्मग्रंथ सर्वांसाठी असतात. कुराण आपणा सर्वांनाच बोधप्रद आहे. मग महाराजांनी ती प्रत आपला मंत्री फकीर

अझिझुद्दीन याला भेट दिली. "मुलांनो, तुम्ही हरमंदिर हे ठिकाण पाहिलं आहे कां ?"

"हो, हो." सर्वांनी एकदमच उत्तर दिलं.

"आजी, तूच तर आम्हाला तिथं नेलं होतंस. तुला नाही का आठवत ?"

"तिथं रणजित सिंहानंच संगमरवरी दगड बसवला अन् सोन्याचं पानही बसवलं. त्यानं अनेक मशिदी आणि मंदिरांचा जीर्णोद्धार केला."

"हा राजा खरंच फार दानशूर असला पाहिजे." पुनीत म्हणाला.

"हो तर !" आजी त्याची री ओढत म्हणाली, "आणखी त्यानं कायकाय केलं होतं माहीत आहे ? आपल्या राजवाड्याच्या दाराबाहेर त्यानं एक पेटी कुलूप लावून ठेवली. कुलुपाच्या किल्ल्या स्वतःपाशी ठेवल्या. ज्या कुणाला काही तक्रारी, गाऱ्हाणी सांगायची असतील ती लिहून पेटीत टाकावी असा सांगावा त्यानं दिला. सर्वांना न्याय मिळावा याबाबत तो फार जागरूक असे. त्याच्या दरबारातील सर्वात वरिष्ठ अधिकाऱ्यानं जरी एखादी आगळीक केलेली त्याला आढळली तर त्यालाही शिक्षा मिळाल्याशिवाय तो रहात नसे. रणजित सिहाच्या पदरी 'अविताबाईल' नावाचा एक इटालियन सेनापती होता. त्यानं या माणसाची नेमणूक पेशावरच्या गव्हर्नरपदी केली होती. एकदा काय झालं, या गव्हर्नरच्या रागाचा पारा चढला आणि रागाच्या भरात त्यानं काही पठाणांची घरं जमीनदोस्त केली. रणजित सिंहाच्या कानी ही बातमी जाताच त्यानं त्या अविताबाईलला फर्मान पाठवलं की त्यानं स्वखर्चानं ही घरं पुनः बांधून द्यावीत. व हे काम पूर्ण झाल्यावर तसा निरोप द्यावा."

"हो बरं झालं, त्या सेनापतीला चांगला धडा मिळाला. त्यानं पुनः कधी गरिबांना छळलं नसेल." अवी आणि पुनीत एकदमच बोलले.

"अगदी बरोबर ! अविताबाईलला दंड झाल्याचं लोकांनाही कळलं अन् सर्वांनाच


एक धडा मिळाला."

"आपल्या प्रजेत परस्पर स्नेहभाव रहावा म्हणून महाराज रणजित सिंह सर्व सण उत्साहानं साजरे करीत असे. वसंतपंचमी, ईद, होळी, वैशाखी, दिवाळी अशा



सर्व उत्सवात तो सहभागी होई. होळीच्या वेळी तो आपल्या सैनिकांना सणासाठी रजा देई आणि रंग खेळण्यासाठी गुलालही देई. तो स्वत: आणि त्याच्या दरबारातील मानकरी सर्वसामान्य जनतेत मिसळून रंग खेळत. परस्परांवर पिचकारीनं रंग उडवून

सुवर्णमंदिर - हरमंदिर साहिब



त्यात चिंब भिजत. सणानिमित्त लोकांना महाराजाकडून बक्षिसंही मिळत."

"एकंदरीत खूप मजा होती तेव्हां." अवी म्हणाला.

"मजा म्हणजे काय फारच मौज चालायची तेव्हा. दिवाळीनिमित्त सर्व सरकारी इमारतींवर रोषणाई केली जाई, फटाक्यांची आतषबाजी होई. लोकांना इनामही मिळे. अशा तऱ्हेनं रणजित सिंहानं आपल्या प्रजेला सुखासमाधानात ठेवलं आणि स्वत:ही सुखी झाला."

अवी कुरकुरत म्हणाला, "राजा अशा तऱ्हेनं आनंदात राहिला तसं आपले आईवडील का नाही वागत? होळीच्या वेळी ते आम्हाला रंग खेळू देत नाहीत की दिवाळीच्या वेळी फटाके उडवू देत नाही - हे काय बरोबर आहे कां?"

"अवी, तुमच्या आईवडिलांचं सांगणं असतं की, तुम्ही चांगल्या रंगांनी खेळा. एकमेकांच्या अंगावर चिखल फेकू नका अन् भांडणं काढू नका. हे सांगणं योग्यच आहे. दिवाळीत ते तुम्हाला लहान फटाके आणून देतात ना? तुम्हाला ते उडवायला मिळतात ना? मोठा स्फोट होणारे बाँबसारखे फटाके ते तुम्हाला देत नाहीत हे ठीकच आहे. पण ते जाऊ दे - आत्ता त्याची चर्चा कशाला? माझी गोष्ट तुम्हाला पुढं ऐकायची आहे का नाही?"

"ऐकायचीय् तर! सांग सांग, आजी." सर्वांनी आग्रह केला.


पुनीतने मोठ्या कुतूहलाने विचारले, "आजी, मी पुष्कळ राजांची चित्रं पाहिली आहेत. त्यात त्यांच्या अंगावर खूप दागदागिने दिसतात. महाराज रणजित सिंह सुद्धा गळ्यात मोत्याच्या माळा घालीत असे कां?"

"छे: छे: मुळीच नाही. रणजित सिंहाला दागिन्यांची फार हौस नव्हती. त्याच्याजवळ एकच तेजस्वी हिरा होता. कोहिनूर नावाचा - कोहिनूर म्हणजे प्रकाशगिरी. हा हिरा डोळे दिपवण्याइतका तेजस्वी होता. जो कोणी तो हिरा पाही तो हिऱ्याची तोंड

फाटेपर्यंत स्तुती करी. महाराजाला या हिऱ्याविषयी विशेष प्रेम होतं. कधीकधी तो दरबारात जाताना हा हिरा आपल्या दंडाला बांधत असे. पण त्यानं स्वतःसाठी सिंहासन केलं नव्हतं बरं का ! त्याला असला डामडौल आवडायचा नाही. दरबारात



उत्सव




तो अगदी एका साध्या खुर्चीवर बसायचा. लोक त्याला महाराज म्हणायचे तेही त्याला आवडायचं नाही. लोकांनी आपल्याला भाईसाहेब म्हणावं, वडील भाऊ मानावं असं त्याला वाटे. फारच झालं तर लोकांनी त्याला सरकार म्हटलेलं तो खपवून घेई."

अवीच्या डोक्यात काय सणक आली कुणास ठाऊक ! सर्व मुलांकडे वळून तो फुशारकीनं म्हणाला, "हं, पोरांनो, आजपासून तुम्ही मला सरकार साहेब म्हणायचं - कळलं का ?"

हित्तीला हे मुळीच आवडलं नाही. तो म्हणाला, "आजी, बघ हा किती चक्रम आहे ! एवढा मोठा महाराजा रणजित सिंह - तो स्वत:ला फक्त सरकार म्हटलेलं चालवून घेई तर हा इथला दीडशहाणा म्हणतोय् मला सरकार साहेब म्हणा . . . का रे बाबा ? का ? तुला काय एकच डोळा आहे ? आम्ही तुला फक्त अवी म्हणणार. कर काय करायचं ते. बघू तरी".


सगळी मुले खदाखदा हसू लागली. तेव्हा अवी रागाने लाल होऊन हित्तीला म्हणाला, "बरं, बरं, बघून घेईन उद्या - मग सांगतो मला किती डोळे आहेत ते."

"अवी, मगाशी तू हित्तीला चिडवलंस तेव्हा तो गप्प बसला ना मी सांगितलं म्हणून. आता त्यानं तुझी चेष्टा केली तर तू का चिडतोस ? अन् भांडण कशाला

उकरून काढतोस ? मुलांनी आणि भावाभावांनी असं एकमेकात भांडू नाही. बरं, आता मी रणजित सिंहाच्या डोळ्याबद्दल सांगणार आहे ते ऐका बघू सगळेजण."

"एकदा इंग्रज गव्हर्नर जनरलनं, फकीर अझिझुद्दीनला विचारलं, 'तुमच्या राजाला एकच डोळा आहे असं आम्ही ऐकतो ते खरं कां ?'

आपल्या आवडत्या खुर्चीवर रणजित सिंह



फकीर म्हणाला, 'खरं आहे, पण त्याच्या एका डोळ्यातच सहस्त्र सूर्यांचं प्रखर तेज आहे. त्याच्याकडे कुणी नजर लावून पाहू शकत नाही. शिवाय मी महाराजांच्या नेत्राबद्दल काही सांगू शकत नाही. कारण मी त्यांच्या पुढ्यात गेलो की माझे डोळे त्यांच्या चरणांवर खिळतात."

"अझिझुद्दिननं किती चतुरपणे उत्तर दिलं नाही कां ?" सुनीत त्याची प्रशंसा करीत म्हणाला.

"म्हणूनच त्याला मंत्रिपद मिळालं." पुनीत म्हणाला, "तो इतका शहाणा आणि चतुर नसता तर कुणी विचारलं असतं का त्याला ?"

मुलांचं बोलणं चालू असताना आजीनं गोष्ट थांबवली होती. ती पुढे सांगू लागली, "अझिझुद्दिनच्या उत्तरावरून तुमच्या हेही लक्षात आलं असेल की प्रजेला आपल्या राज़ाबद्दल किती प्रेम वाटत होतं ते ! पंजाबची जनता त्याच्यासाठी जीव द्यायला तयार होती. महाराजांना थोडं बरं नाही अशी नुसती कुणकुण लागली की सगळे प्रजाजन मंदिरात, मशिदीत किंवा गुरूद्वारात जाऊन आपल्या राजाच्या स्वास्थ्यासाठी ईश्वराची मनोभावे प्रार्थना करीत. पण असं आहे की - कुणी अमर नाही. जन्माला आलेल्या प्रत्येकाचं आयुष्य केव्हा ना केव्हा संपतंच. तशीच एक दिवस महाराजा रणजित सिंहांच्या जीवनाची अखेर झाली. त्यांच्या मृत्युची बातमी कळताच सर्व प्रजा शोकाकुल झाली. लोक घराबाहेर पडून छाती पिटून रडू लागले. एकमेकांना मिठया मारून आक्रोश करीत त्यांनी आपल्या दुःखाला वाट करून दिली.


'महाराज, आपण आम्हाला सोडून का गेलात ?'

'पुनः असा राजा आम्हाला कधी मिळेल ?'

'असा राजा पुनः पृथ्वीवर येणं अशक्यच आहे'.

वेगवेगळ्या तऱ्हेने दुःखमय शब्दात प्रजा आपला शोक व्यक्त करीत होती. सर्वांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहत होत्या. पंजाबमधे असा एकही माणूस नव्हता की ज्याचे हृदय दुःखाने व्यापले नव्हते. संपूर्ण राज्यात शोककळा पसरली होती."

पुनीत म्हणाला, "मला ठाऊक आहे की काही राजे असे असतात की ते मरण पावल्यावर लोक म्हणतात, 'बरं झालं. पीडा गेली.' पण रणजित सिंह त्यांपैकी



अंत्ययात्रा

नव्हता. हो ना आजी ? आजतागायत लोक त्याची स्तुतिस्तोत्रं गातात. राजा असावा तर असा !"

"माझा छोटा राजा काय करतोय् ?" गाढ झोपलेल्या सनीला थोपटीत आजी म्हणाली,

"चला मुलांनो, आता मात्र खरंच झोपायची वेळ झालीय्. उद्या सकाळी आपल्याला रामबाग उद्यानात सहलीला जायचंय् ना ? ही बाग राजा रणजित सिंहानंच वसवली होती बरं का !"





रु. 11.00 ISBN 81-237-1427-0

नेशनल बुक ट्रस्ट, इंडिया